८

# ।। शब्दसृष्टि ।।

वर्ष 13 ... मूल्य ₹ 400

## ।। लोकसंत गाडगेबाबा व राष्ट्रसंत तुकडोजी विशेषांक ।।




।। संस्थापक ।।
डॉ. विजया

।। अतिथि संपादक ।।
डॉ. दिनकर येवलेकर

।। संपादक ।।
डॉ. मनोहर

।। समन्वय संपादक ।।
डॉ. सतीश पावडे


Scanned by Scanner Go

**सोडुनिया खऱ्या देवा । करी म्हसोबाची सेवा ॥**

गाडगेबाबा पंढरपूरला नेहमी जात पण विठ्ठलाचे दर्शन कधीच घेत नसत. तीर्थयात्रेला जाणे ही सुद्धा एक अंधश्रद्धा आहे असे सांगताना संत कबीराचा दाखला देऊन म्हणतात.

**जत्रा में फत्रा बिठाया । तीरथ बनाया पानी ॥**

**दुनिया भई दिवानी । पैसे की धुलधाऽऽनी ॥**

तीर्थाला जाणे पैशाचा नाश असून खानाखराब आहे असे ते म्हणत. "दगडाचा देव बोलिल तो कैसा । कवणकाली वाचा फुटीलं... त्याऽऽसी ।। तीर्थे देव धोंडा पाणी । देव रोकडा सज्जनी ।।" असे अनेक उदाहरणे आपल्या कीर्तनातून बाबा देत असत.

तीर्थयात्रा, जत्रा म्हणजे, भोळ्याभाबड्या लोकांना लुटण्याची दुकाने आहेत असे बाबांचे स्पष्ट मत होते. तुकाराम यांच्या प्रमाणे बाबांनी आपल्या कीर्तनातून समाजातील अंधश्रद्धा व दैववादाला मूठमाती दिली. ते म्हणत असत की, सत्यनारायण हा देव पोट भरण्याचा धंदा आहे. सत्यनारायण करणाऱ्या लोकांच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालतात. दि. 08.11.1956 रोजी बांद्रा पोलीस स्टेशन, मुंबई येथील शेवटच्या कीर्तनात ते म्हणतात, सत्यनारायण ही देवाची भक्ती नाही, तर ते पोट भरण्याचे साधन आहे. सत्यनारायण हे लोभी लोक करतात... ती भक्ती नाही. ते भोळसटांना फसवून पैसे काढण्याचा धंदा आहे असे सांगतात.

गाडगेबाबा नवस-सायास करणाऱ्या लोकांनाही विचारी बनवतात. नवस करणऱ्यांना मुलं-बाळं होतात अशांना तुकोबारायांच्या अभंगाचा दाखला देऊन सांगतात.

**नवसे सायासे कन्या पुत्र होती ।**

**मग का करणे लागे पती ॥**

हे साधे लोकांना कळले पाहिजे, पण लोक आपल्या डोक्याचा वापरच करत नाहीत म्हणून पुढे ते म्हणतात,

**नाही मन निर्मळ । करील साबण ॥**

या तुकारामांच्या उक्तीप्रमाणे गाडगेबाबांनी बहुजन समाजाला अंतर्बाह्य स्वच्छ करण्याचा शेवटपर्यंत प्रयत्न केला.

अभिषेक, यज्ञ, श्राद्ध करणाऱ्या लोकावर, रूढींवर कीर्तनातून जोरदार टीका केली. भट-भिक्षुकांच्या लबाडीवर प्रकाश टाकताना त्यांनी सांगितलेली उदाहरणे फार विचार करायला लावणारे आहेत. मेलेल्या व्यक्तीला शांती मिळावी म्हणून भट-भिक्षुक, श्राद्ध घालणाऱ्या लोकांचे शोषण कसे करतात ते उदाहरण सांगतात, 'आम्हाला लाडू खाऊ घाला' म्हणजे ते तुमच्या स्वर्गातल्या बापाला भेटतील, असे म्हणणाऱ्या भट-भिक्षुकांना धडा शिकविण्यासाठी गाडगेबाबा नदीत उभारून ओंजळीने काठावर पाणी फेकू लागतात. ते पाहून एकाने विचारले, हे काय करताय? गाडगेबाबा म्हणाले बाप्पा हो! माझ्या वावरात पऱ्हाटी उभी आहे, तिला हे पाणी देऊन राहिलो. त्यावर तो विचारतो, तुझे वावर कुठे आहे? तेव्हा गाडगेबाबा म्हणतात, आहे इथून दहा कोसावर. त्यावर तो हसायला लागला. हे खरचं आहे. दहा कोसावर पाणी कसे जाईल पण आता हे सांगा भडव्या पंड्याच्या पोटातून लाडू स्वर्गात कसे पोहचतील? स्वर्ग तर दहा कोसापेक्षा दूर आहे. दुसऱ्या एका उदाहरणात ते म्हणतात, एकदा घरी श्राद्ध घातल्यानंतर भटजी त्याच्या मुलाला म्हणाले, स्वर्गात तुमच्या वडिलांना शांती भेटावी वाटत असेल तर आम्हाला पैसे द्या, अशी मागणी करू लागले. तेव्हा त्याच [illegible] भिक्षुकाला सांगितले की, काल आमच्या [illegible] आले होते. त्यांचे गुडघे खूप दुखत आहेत. त्यामुळे ते खूप [illegible] तेव्हा त्यांनी आमच्याकडे निरोप दिलाय की, श्राद्ध [illegible] भिक्षुकांच्या गुडघ्याला [illegible] द्या. तेव्हा माझे गुडघे दुखायचे आपोआप बरे होतील, असे म्हणताच भट-भिक्षुक तिथून पळून गेले.

अंधश्रद्धेला कायमची मूठमाती देण्यासाठी गाडगेबाबांनी अहोरात्र काम केले. लोकभाषेतून लोकांचे प्रबोधन केले. आपल्या हाती अंधश्रद्धा निर्मूलनाचा खराटा घेऊन समाजमन विज्ञाननिष्ठ बनविण्याचा आटोकाट प्रयत्न केला. समाज प्रबोधनाच्या ऐरणीवर लोकभाषेच्या हातोड्याने अंधश्रद्धेचा गाठी फोडल्या.

अशा पद्धतीने गाडगेबाबा लोकमनातून जातीचे खूळ काढण्यासाठी कीर्तनाचा वापर करत असत. सर्वांची गंगा एकच आहे. एक नदी मांगाची एक मराठ्याची, असं कधीच असत नाही. गाडगेबाबा समतावादी मानवतावादी विचारवंत असल्यामुळे जाती-जातीमधील कलह निरर्थक असतात हे साध्या शब्दातून समाजाला पटवून देत असत. ते नेहमी म्हणत की, जोपर्यंत या समाजात दलित वर्ग आहे, तोपर्यंत मी ही त्यातलाच आहे जोपर्यंत समाजात अपराधी आहेत तोपर्यंत, मी त्यातलाच आहे. जोपर्यंत समाजात एक तरी आत्मा बंधनात खितपत पडला असेल, तोपर्यंत मी देखील स्वतंत्र नाही इतकी व्यापक गाडगेबाबांची जात-निर्मूलनाची भूमिका होती. जगात दोनच जाती – बाई व पुरुष या भूमिकेतूनच बाबांनी जाती निर्मूलनासाठी कार्य केले.

संत गाडगेबाबांच्या जीवन कार्याचा, त्यांच्या कर्तृत्वाचा, त्यांच्या समकालीन समाजपरिवर्तनवादी चळवळीत व संस्थेत, संघटनेत काम करण्याऱ्या अनेक लोकांना गाडगेबाबाच्या कार्याचा मोठा अभिमान वाटायचा. गाडगेबाबांचे विचार ऐकण्यासाठी, त्यांना भेटण्यासाठी अनेक मंडळी अस्वस्थ होत. महात्मा गांधी पासून ते तत्कालीन शिक्षणमंत्री बाळासाहेब खेर, प्रबोधनकार ठाकरे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना गाडगेबाबांचे कीर्तन ऐकण्याचे भाग्य मिळाले. त्यामुळे त्यांच्या समकालीन काम करणाऱ्या राजकीय विचारवंत, समाजसुधारक यांचा अनुबंध गाडगेबाबासोबत कायमचा निर्माण झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना गाडगेबाबाचे कीर्तन फार आवडायचे. तीन-तीन-तास त्यांचे कीर्तन ऐकायचे. त्यांचा सल्ला घ्यायचे. 20 डिसेंबर 1956 रोजी हा देश एका समतावादी चळवळीतील आधुनिक विचारवंताला मुकला, ही देशाची कधीही भरून न निघणारी हानी होती.

आजही 21 व्या शतकाच्या दुसऱ्या शतकात भारतीय समाजाला, समाजसुधारकांना अंधश्रद्धा निर्मूलनासाठी महाराष्ट्रात व देशात चळवळी उभ्या कराव्या लागतात व समाजाला देवमुक्त, भयमुक्त, शोषण विरहित, विवेकवादी व विज्ञानवादी बनविण्यासाठी स्वतःचा जीव गमवावा लागतो. ही पुरोगामी महाराष्ट्राची प्रचंड मोठी शोकांतिका आहे. गाडगेबाबांनी सांगितलेल्या विचारांचा वारसा जोपर्यंत हा देश अंगिकारणार नाही, तोपर्यंत गाडगेबाबांच्या स्वप्नातील मानवतावादी समतावादी राष्ट्र निर्माण होणार नाही. यात तिळमात्र शंका नाही.

– **डॉ. हंसराज दत्तात्रय भोसले**
भ्रमणध्वनी : 94214 48107



Scanned by Scanner Go

# ॥ आधुनिक विचारवंत : संत गाडगेबाबा ॥

डॉ. हंसराज दत्तात्रय भोसले

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे, तशी ती विचारवंतांची देखील भूमी आहे. संतानी तत्कालीन परिस्थितीत कीर्तन, भजन, प्रवचन, अभंग, भारूड आदीच्या माध्यमातून समाजाचे आध्यात्मिक नेतृत्व करून लोकशाही व मानवतावादी मूल्ये निर्माण करण्याचा व समाजात रुजवण्याचा प्रयत्न केला. नंतरच्या काळात संतांची ही लोकचळवळ समाजसुधारक, विचारवंत, लेखक, कलावंत यांनी आपापल्या क्षमतेनुसार पुढे घेऊन जाण्याचा प्रयत्न केला. आणि आधुनिक काळात विसाव्या शतकात समतेचा व मानवतेचा आगळावेगळा आदर्श घालून देणारे, समतेच्या चळवळीतील आधुनिक विचारवंत म्हणजे संत गाडगेबाबा.

प्रचलित अर्थाने संत गाडगेबाबा यांच्या नावावर वैचारिक लेखन नसले तरी, त्यांची संपूर्ण कीर्तने ही प्रखर वैचारिकतेने व विवेकवादांनी भरलेली आणि भारलेली होती. कीर्तनासारख्या प्रभावी, मौखिक-प्रसार माध्यमांचा उपयोग करून संत गाडगेबाबांनी कृतिशीलतेच्या माध्यमातून समता प्रस्थापित करण्यासाठी सातत्याने विचार मंथन केले. त्यांच्या कार्याचा विचार करता त्यांना समतेच्या चळवळीतील आधुनिक विचारवंत असे निसंकोच म्हणता येते.

1905 ते 1956 या दरम्यान संत गाडगेबाबांनी आख्खा देश धुंडाळला. समाज चिंतन केले, लोक निरीक्षण केले, आत्मपरीक्षणही केले, उपाशी-तापाशी लोक पाहिले, लोकांचे स्वार्थं पाहिले, त्यांचे दुःख पाहिले, त्यांचा शोक पाहिला, उघडे-नागडे रोगी, शेतकरी, शेतमजूर लोक पाहिले. देवा-धर्माच्या नावावर बकऱ्यांची कंदूरी करणारे, नवस-सायास, अभिषेक, दोरागंडा करणारे, करवून घेणारे सगळेच लोक पाहिले. हे पाहून संत गाडगेबाबाचे अंतःकरण हेलावून गेले. त्यांच्या लक्षात आले की, माणसे माणसांना विनाकारण दुःखाच्या खाईत का ढकलतात? समाजातल्या दुःखी लोकांचे दुःख कशामुळे वाढले? श्रमिकांच्या घामावर श्रीमंत कसे सुखावले? गरीब लोक बेघर का राहिले? त्यांना दोन वेळचे अन्न का मिळत नाही? आजारी पडलेल्यांना औषध का मिळत नाही? सवर्ण लोक खालच्या वर्गाला का शिवत नाहीत? त्यांना आपल्या विहिरीवर पाणी का भरू देत नाहीत? श्रीमंत लोक अधिक श्रीमंत होऊ लागले, गरीब आणखी गरीब होऊ लागले? अशा एक ना अनेक प्रश्नांनी संत गाडगेबाबांचे मन व्याकूळ झाले. लोकांच्या ठायी असलेल्या अज्ञानामुळे हे सर्व घडते. हे त्यांनी ओळखले. समाजातील गोर-गरिबांची दुरावस्था दूर करण्यासाठी ज्ञानदान शिक्षण हाच माणसाच्या समृद्ध जीवनाचा रामबाण उपाय आहे. हे ओळखून या सर्व समाजविघातक व विसंगत परिस्थिंतीवर मात करण्यासाठी संताच्या कीर्तन या माध्यमाचीच निवड करून समाज प्रबोधन व लोक शिक्षणाला सुरुवात केली.

लोकशिक्षणातून समाज परिवर्तन करण्यासाठी प्रबोधनाचे माध्यम म्हणून संत गाडगेबाबांनी पारंपरिक, मौखिक, कीर्तन या जनसाधनाचा आधार घेतला. 'हरदासी व वारकरी' कीर्तनापेक्षा त्यांचे कीर्तन पूर्णतः वेगळे होते. त्यांची स्वतःची शैली होती. कीर्तनातून स्वतःचे जीवनविषयक तत्त्वज्ञान, ते व्यक्त करीत होते. त्यांच्या व्यक्तित्वाला साजेशी अशी त्यांची लोकसंवादी कीर्तनशैली होती. लोकमाणसाची नाडी ओळखून गाडगेबाबांनी आपल्या कीर्तनाच्या माध्यमातून लोकांना मूल्यशिक्षण दिले. त्यांनी सांगितलेली मूल्ये म्हणजे त्यांचा रोकडा धर्मच होता. गरिबीमुळे त्यांना शाळेत कधी जाता आले नाही मात्र अनुभवाच्या शाळेत त्यांना फार मोठे ज्ञानाचे गाठोडे सापडले म्हणूनच त्यांचे नाव अमरावती विद्यापीठाशी कायमचे जोडले गेले.

संत गाडगेबाबांनी समाजप्रबोधनाच्या वाटा आयुष्यभर उजळल्या, लोकशिक्षण, अंधश्रद्धा, निर्मूलन, श्रमप्रतिष्ठा, अस्पृश्यता निवारण, दैववाद, अशिक्षितपणा नष्ट करणे, व्यसनमुक्त समाजनिर्मितीसाठी 50 वर्षे धडपडत राहिले. स्वतःतील आळस, जीभेचा लोभ, वासना इत्यादी दुर्गुण नष्ट करून माणसांतील निखळ माणूस शोधण्यासाठी प्रथम स्वतःलाच पूर्ण मानव बनविले. संत गाडगेबाबांचे कार्य फार व्यापक पद्धतीचे होते. आपल्या शेवटच्या क्षणापर्यंत विज्ञानवादी, विचार घेऊन बहुजन समाजाची सेवा केली. स्वतः चिंध्या वापरून खापराच्या येळणीत जेवण करून गावोगाव, समाज अन् समाजातील माणसांची मने साफ करण्याचा प्रयत्न केला. ते केवळ "गोपाळा गोपाळा. देवकी नंदन गोपाळा" या कीर्तन शैलीच्या माध्यमातून.

संत गाडगेबाबा प्रखर विवेकवादी होते, बुद्धिप्रामाण्यवादी द्रष्टे विचारवंत संत होते. म्हणूनच लौकिक अर्थाने निरक्षर असूनही आपल्या कीर्तनाच्या माध्यमामधून बहुजन समाजाला विवेकवाद बुद्धिप्रामाण्यवाद सांगण्याचा प्रयत्न केला. आपल्या लोकविलक्षण लोकसंवादी कीर्तनशैलीच्या माध्यमातून आपल्या पूर्वसुरींनी सांगितलेला बुद्धिप्रामाण्यवाद, विवेकवाद सांगताना संत तुकाराम, संत कबीर यांच्या अभंगाचे उदाहरण देत-देत निरूपण करण्याची त्यांची किमया त्यांच्या शिवाय इतरांना जमणे शक्य नाही. बहुजन समाजाचे अधःपतन त्यांच्या अंधश्रद्धेत दडलेले असून त्यातून त्यांना बाहेर काढण्यासाठी गाडगेबाबांनी हातात खराटा घेतला. दिवसभर खराट्याच्या माध्यमातून समाजाला बाहेरून स्वच्छ केले व रात्री कीर्तनाच्या माध्यमातून समाजाचे मन, मेंदू स्वच्छ करण्याचे काम केले. गाडगेबाबांनी व्यक्तिधर्म, कुटुंबधर्म, समाजधर्म आणि राष्ट्रधर्म समाजाला शिकविला. ग्रंथ-प्रामाण्य, कर्मकांड नाकारले, मूर्तिपूजा नाकारली, तीर्थयात्रेतील शोषणाचा तीटकारा केला. सण, श्राद्ध व पोथीनिष्ठता नाकारली. समाजात रूढ असलेल्या भंपक प्रथा, परंपरा व धर्मकल्पना यांना मूठमाती देऊन समाजाला भयमुक्त व अंधश्रद्धामुक्त करण्याचा खरा धर्म स्वीकारला तोच धर्म कीर्तनाच्या अभंगातून सांगताना गाडगेबाबा संत तुकारामाच्या अभंगाचा दाखला देत म्हणतात,

शेंदुर माखोनिया धोंडा । पाया पडती पोरे रांडा ॥
देव दगडाचा केला । गवंडी त्याचा बाप झाला ॥
देव सोन्याचा केला । सोनार त्याचा बाप झाला ॥
देव मातीचा केला । कुंभार त्याचा बाप झाला ॥



Scanned by Scanner Go

# ॥ अनुक्रमणिका ॥


संपादकीय

अतिथि संपादकीय 5

समन्वय संपादकीय 7

भाषण 7

मैं शुद्ध आलोचक हूं... 19
आचार्य आनंदप्रकाश दीक्षित

**धारावाहिक**

जम्मू व कश्मीर का राज्यपक्षी : नीलकंठ 23
विजया व मनोहर

**गाडगेबाबा व तुकडोजी : संयुक्त**

समन्वयवादी संत : गाडगेबाबा व तुकडोजी 25
विजया

राष्ट्रवंदना व विश्वगीत 26
तुकडोजी महाराज

कविता : 27
देव, प्रबोधन – गाडगेबाबा
दे वरचि असा दे, या झोपडीत माझ्या – तुकडोजी
लोकसंत-ग. दि. माडगूळकर, सद्विचार-छोटू निर्मलकर

राष्ट्रसंत तुकडोजी के चुनिंदा हिंदी पद 29

गाडगेबाबा यांचे अंतिम कीर्तन 33

तुकडोजी महाराज यांचे भाषण : धर्मनिरपेक्ष राष्ट्र 39
शब्दांकन : सागर

ग्राम-जयंति की परिभाषा 43
तुकडोजी महाराज

समाज सुधारक गाडगेबाबा व तुकडोजी महाराज 45
मनोहर

**लोकसंत गाडगेबाबा : हिंदी लेख**

महान समाजवादी : संत गाडगेबाबा 49
आचार्य प्रल्हाद केशव अत्रे

निष्काम कर्मयोगी : संत गाडगेबाबा 51
मधुकर वाकोडे

लोकशिक्षक गाडगेबाबा 53
करुणाशंकर उपाध्याय

संत गाडगेबाबा व प्रबोधनकार ठाकरे 55
मनोहर

लोकसंत गाडगेबाबा का तत्त्वज्ञान 57
सागर

दो बाबा : अनोखा मर्मबंध 59
सतीश पावडे

डेबूजी के पदचिह्न खोजते हुए... 61
प्रदीप पाटील

**लोकसंत गाडगेबाबा : मराठी लेख**

संत गाडगेबाबा आणि त्यांची स्वच्छता मोहीम 63
विलास चिंतामण देशपांडे

मानवधर्माचा संदेश देणारा संत : गाडगे महाराज 65
व्ही. एल. एरंडे

कीर्तनातून जनसंवाद साधणारे लोकसंत गाडगेबाबा 67
सतीश पावडे

निरपेक्ष सेवेचा उत्कट आविष्कार : संत गाडगेबाबा 69
आचार्य अरविंद देशमुख

संत गाडगेबाबा : एक वास्तव 70
अमोल मिटकरी

कीर्तन नव्हे : एक जन-आंदोलन 72
संतोष अरसोड

आधुनिक विचारवंत : संत गाडगेबाबा 74
हंसराज भोसले

गाडगेबाबा आणि अच्युतदादा व त्यांचे कुटुंब 76
सतीश जामोदकर

गाडगेबाबा साकारताना 77
दिलीप खत्री

**राष्ट्रसंत तुकडोजी : हिंदी लेख**

राष्ट्रसंत का साहित्य प्रवाह 79
ग्रामगीताचार्य रामकृष्ण बेलूरकर

साम्यवादी तुकडोजी 81
जैमिनी कडू

राष्ट्रसंत तुकडोजी का हिंदी काव्य 85
दिनकर येवलेकर




Scanned by Scanner Go

भारतीय साहित्य, कला व संस्कृति का दर्पण

# ।। शब्दसृष्टि ।।

हिंदी-मराठी द्विभाषिक त्रैमासिक पत्रिका

भारतीय साहित्य, कला व संस्कृतीचे दर्पण

# ।। शब्दसृष्टी ।।

हिंदी-मराठी द्विभाषिक त्रैमासिक पत्रिका

संस्थापक : डॉ. विजया

प्रेरणा-स्त्रोत : डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर

संपादक : डॉ. मनोहर

मुख्य परामर्शदाता : डॉ. रामजी तिवारी

परामर्शदाता

डॉ. प्रमोद तलगेरी ❖ डॉ. निशिकांत मिरजकर ❖ डॉ. गजानन चव्हाण ❖ डॉ. सूर्यबाला

श्री प्रकाश भातम्ब्रेकर ❖ डॉ. नागनाथ कोत्तापल्ले ❖ डॉ. दामोदर खड़से

वर्ष : तेरहवां (2020) ॥ विशेषांक : 8 ॥ वर्ष : तेरावे (2020)

जयांचेनि आठवें। शब्दसृष्टि आंगवे।
सारस्वत आघवें। जिव्हेसि ये ॥
– ज्ञानेश्वरी

# ।। लोकसंत गाडगेबाबा व राष्ट्रसंत तुकडोजी विशेषांक ।।

अतिथि संपादक : **डॉ. दिनकर येवलेकर**

समन्वय संपादक : **डॉ. सतीश पावडे**

सहयोगी संपादक

**प्राचार्य मुकुंद आंधळकर ❖ डॉ. करुणाशंकर उपाध्याय**

प्रबंधन व रचना : **सुमन**

आवरण : **संकल्प**

शब्द संयोजन : **शब्दसृष्टी संगणक कक्ष**

कला व सज्जा : **रवींद्र महाडिक**




**प्रकाशक**

**शब्दसृष्टी** भारतीय साहित्य, कला व सांस्कृतिक प्रतिष्ठान
बी-1301, हरी हेरिटेज, प्लॉट-17ए से 20
सेक्टर-22 (कामोठे नोड), हावरे चौक,
खांदेश्वर, नवी मुंबई - 410 209.

**मुद्रक**

**शब्दसृष्टी** भारतीय साहित्य, कला व सांस्कृतिक प्रतिष्ठान
बी-1301, हरी हेरिटेज, प्लॉट-17ए से 20
सेक्टर-22 (कामोठे नोड), हावरे चौक,
खांदेश्वर, नवी मुंबई - 410 209.

**इस अंक का मूल्य**
**₹ 400.00**

**प्रसिद्धि प्रमुख : डॉ. अनिल गायकवाड**

**कानूनी सलाहकार**
**ॲड. प्रेम चंद्र त्रिपाठी**

**॥ संपादकीय संपर्क ॥**

बी-1301, हरी हेरिटेज, प्लॉट-17ए से 20, सेक्टर-22 (कामोठे नोड), हावरे चौक, खांदेश्वर, नवी मुंबई - 410 209.

भ्रमणध्वनि : 98215 45288 • व्हॉट्स ॲप : 98702 55527

E-mail : shabdasrishti@gmail.com / dr.manohar1718@gmail.com ❖ Web : www. shabdasrishti.com

❖ 'शब्दसृष्टि' में प्रकाशित रचनाओं के विचारों से इसके परामर्शदाता, संपादक तथा संपादन समिति का सहमत होना आवश्यक नहीं है.

❖ अंक में प्रकाशित सामग्री के पुनर्प्रकाशन के लिए लिखित अनुमति अनिवार्य है. ❖ सभी विवादों का न्याय क्षेत्र मात्र मुंबई होगा.

❖ लेखन-संपादन-प्रकाशन पूर्णतः अवैतनिक एवं अव्यावसायिक है.

**।। SHABDASRISHTI ।।**

**Year : 13th** ❖ *Bi-lingual Hindi-Marathi Quarterly Magazine* ❖ **Special Issue : VIIIth**

**।। Loksant Gadgebaba Va Rastrasant Tukdoji Visheshank ।।**

**Date of Publication : February 22, 2020**

(28)

Scanned by Scanner Go